# मराठीभाषा व वाङ्मय मंडळ- २०१५-२०१६

| अ.क्र. | नाव | |
|---|---|---|
| १ | प्रा. ढोले आय.आर. | अध्यक्ष |
| २ | कु. पालकर सोनल शिवाजी | सचिव |
| ३ | कु. शिंदे मिनाक्षी बाळकृष्ण | सहसचिव |

| अ.क्र. | नाव | वर्ग | |
|---|---|---|---|
| १ | कु. अजय चंदकांत मोहिते | प्रथम वर्ष कला | सदस्य |
| २ | कु. ऋषिकेश रविंद्र मोरे | प्रथम वर्ष कला | सदस्य |
| ३ | कु. प्राची संतोष पालकर | प्रथम वर्ष वाणिज्य | सदस्य |
| ४ | कु. सुप्रिया सुनिल जाधव | प्रथम वर्ष वाणिज्य | सदस्य |
| ५ | कु. उद्देश रामदास माहिते | प्रथम वर्ष विज्ञान | सदस्य |
| ६ | कु. पृथा शेखर गडकरी | प्रथम वर्ष विज्ञान | सदस्य |
| ७ | कु. गायत्री महेश कठापूरकर | प्रथम वर्ष विज्ञान | सदस्य |
| ८ | कु. जयश्री राजू झोरे | व्दितीय वर्ष कला | सदस्य |
| ९ | कु. विजय भिकाजी होळकर | व्दितीय वर्ष कला | सदस्य |
| १० | कु. सुचिता सुर्यकांत मोरे | व्दितीय वर्ष वाणिज्य | सदस्य |
| ११ | कु. अक्षया विजय जंगम | व्दितीय वर्ष वाणिज्य | सदस्य |
| १२ | कु. अमृता नागेश संसारे | व्दितीय वर्ष वाणिज्य | सदस्य |
| १३ | कु. प्राजक्ता बाबासाहेब चव्हाण | व्दितीय वर्ष विज्ञान | सदस्य |
| १४ | कु. सुचित सुनिल अंधेरे | व्दितीय वर्ष विज्ञान | सदस्य |
| १५ | कु. शितल बाळकृष्ण पालकर | तृतीय वर्ष कला | सदस्य |
| १६ | कु. पंकज मिलिंद गायकवाड | तृतीय वर्ष कला | सदस्य |
| १७ | कु. श्रीकांत चंद्रकांत तळवटकर | तृतीय वर्ष वाणिज्य | सदस्य |
| १८ | कु. अमृता पद्माकर पोटसूरे | तृतीय वर्ष वाणिज्य | सदस्य |
| १९ | कु. माऊली वामन दाखिनकर | तृतीय वर्ष विज्ञान | सदस्य |
| २० | कु. मनोज मदज पेनकर | तृतीय वर्ष विज्ञान | सदस्य |

## उद्घाटनसमारंभ :-

२०१५-१६ या शैक्षणिकवर्षातील **'मराठी भाषा व वाङ्मय मंडळ '** चा उद्घाटन समारंभ माहविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.डी. गिरी यांच्या अध्यक्षतेखाली **प्रा.जगदीश संसारे, मराठी विभाग -सेंट जोसेफ महाविद्यालय, विरार, जि.ठाणे** यांच्या हस्ते पार पडला.

या प्रसंगी प्रा.जगदीश संसारे यांनी विद्यार्थ्यांनां मराठी भाषेचे ज्ञान क्षेत्रातील महत्व तसेच मराठी वाड्.मयाच्या इतिहासातील मान्यवरांचे योगदान उदाहरणासह पटवून दिले. तसेच आचार्य अत्रे व इतर मान्यवर विनोदी लेखकांचे लेखन त्यांच्या विनोदासह स्पष्ट केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. जी.डी.गिरी यांनी मराठी भाषेची परंपरा व भाषेचे सौंदर्य विद्यार्थ्याना पटवून दिले व भविष्यात भाषा संर्वधनासाठी विद्यार्थ्यांची भूमिका किती महत्वाची आहे हे स्पष्ट केले.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा.ढोले आय.आर. यांनी केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाड्.मय मंडळ सचिव कु. सोनल पालकर हीने केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, वाङ्मय मंडळाचे सदस्य, विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

# उद्घाटन समारंभ विविध क्षणचित्रे






Sea WOOD


Sea WOOD


मराठी भाषा व वाङ्मय मंडळ
उद्घाटन समारंभ
माणगांव तालुका एज्युकेशन सोसायटी
गोरेगांव रायगड


मराठी भाषा व वाङ्मय मंडळ
उद्घाटन समारंभ
माणगांव तालुका एज्युकेशन सोसायटी
गोरेगांव रायगड






# भाषा व स्पर्धा परीक्षा : व्याख्यान -

'मराठी भाषा व वाड्.मय मंडळा' च्या वतीने दिनांक १२/१२/२०१५ वार शनिवार रोजी ठिक १०.०० वाजता प्रा. दिगंबर टेकाळे, मराठी विभाग प्रमुख, वसंतराव नाईक महाविद्यालय,म्हसळा, जि.रायगड. यांचे भाषा व स्पर्धा परीक्षा या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानात स्पर्धा परीक्षेमधील भाषेचे महत्व त्यांनी अभ्यासक्रमासह विशद केले. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक असणा-या सर्व गोष्टीची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना त्यांनी दिली. या प्रसंगी कला,वाणिज्य व विज्ञान या तीनही ज्ञानशाखांमधील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा.ढोले आय.आर. यांनी केले तर सूत्रसंचालन वाड्.मय मंडळ सचिव कु.सोनल पालकर हीने केले.





भाषा व स्पर्धा परीक्षा या विषयावर विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्रा. दिगंबर टेकाळे, मराठी विभाग प्रमुख, वसंतराव नाईक महाविद्यालय,म्हसळा, जि.रायगड.




भाषा व स्पर्धा परीक्षा या विषयावर आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा.ढोले आय.आर. - मराठी भाषा व वाड्.मय मंडळ अध्यक्ष

## कवी मंगेश पाडगांवकर श्रध्दांजली कार्यक्रम :-

मराठीतील प्रसिध्द कवी भावगीतकार, मंगेश पाडगांवकर यांचा मृत्यू नुकताच झाला. त्यावेळी त्यांना एक आगळी-वेगळी श्रध्दांजली मराठी विभागाच्या वतीने देण्यात आली. या कार्यक्रमात पाडगांवकरांच्या कविता विद्यार्थ्यांनी सादर केल्या तसेच मंगेश पाडगांवकरांनी सादर केलेली काव्यरचना ध्वनीफितीच्या व चित्रफितीच्या माध्यमातून दाखविण्यात आल्या.




## मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग :-

प्राचीन काळातील मराठी भाषेचा इतिहास पाहता. इ.स.१३५० पर्यंत महाराष्ट्रात यादव घराण्याचे राज्य होते. वेगवेगळे यादव राजे या काळात राजपदावर आले. त्यांनी आपली सत्ता महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही वाढवली. या यादव घराण्यात **'राजरामदेवराय'** यांच्या काळात विशेष सुबत्ता महाराष्ट्रात होती. याचा उल्लेख **'ज्ञानेश्वरीत'** आला आहे. याच रामदेवरायांच्या काळात **'हेमाड पंडित'** नावाचा एक प्रधान त्यांच्या राजदरबारात होता. या पंडिताने महाराष्ट्राला मोडी लिपी व 'बाजरी' (धान्य) या दोन गोष्टी दिल्या. या मोडी लिपीचा उद्गाता हेमाड पंडित आहे.

यादव काळापासून आग्लकालीन कालखंडापर्यंत ज्या सत्ता आल्या व गेल्या. समाज जीवनात जे बदल झाले, त्या वेळचा सर्व पत्रव्यवहार, ऐतिहासिक कागदपत्रे - एकूणच सर्व इतिहास या मोडी लिपीत आहे. काळाच्या ओघात ही लिपी ज्ञात असणारे खूप कमी लोक आज उपलब्ध आहेत. त्यामुळे इतिहासाचा अनमोल ठेवा. या भाषेत बंदिस्त आहे. या इतिहासाची माहिती व्हावी ऐतिहासिक दस्तऐवज पडताळून खरा इतिहास माहित व्हावा तसेच भविष्यात शासकिय,निमशासकिय नोकरीत या मोडीच्या अभ्यासाचा मुलानां उपयोग व्हावा म्हणून मोडी लिपीच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दि.१५ मार्च ते १५ एप्रिल २०१६ या कालावधीत करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा प्राचार्य डॉ.जी.डी.गिरी यांच्या अध्यक्षतेखाली श्रीप्रकाश अधिकारी यांच्या हस्ते मोडी तज्ञ श्रीमंत उदसिंह राजेयादव-अध्यक्ष, 'राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर', मोडी माष्टर सिंघम सर, उपाध्यक्ष - राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर या मान्यवरांच्या उपस्थितीत दि.१८/०२/२०१६ गुरुवार रोजी पार पडला. या प्रशिक्षण वर्गासाठी महाविद्यालयातील एकूण ४२ विद्यार्थ्यांनी आपली नाव नोंदली असून महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी तसेच गोरेगांव व परिसरातील नागरीकांनीही या प्रशिक्षण वर्गासाठी नावनोंदणी केली आहे.

# मोडी लिपी प्रशिक्षण उद्‌घाटन समारंभ विविध क्षणचित्रे







मोडी लिपी प्राथमिक,प्रगत प्रशिक्षण वर्ग उद्घाटन समारोह
गुरुवार, दि. १८ फेब्रुवारी २०१६
कार्यक्रमाचे उद्घाटक
श्री. श्रीप्रकाश अधिकारी
कार्यक्रमाचे अध्यक्ष
श्री. दिलीपभाई शेठ
मार्गदर्शक





## ❖ मराठी राजभाषा दिन :-

माणगांव तालुका एज्युकेशन सोसायटीचे दोशी वकील कला व गो.ना.स.बॅंक विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात **'मराठी भाषा व वाड्.मय मंडळा'** कडून विद्यार्थ्यांच्या सृजनशक्तीला वाव मिळावा म्हणून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

महाविद्यालयात **'मराठी राजभाषा दिन'** दरवर्षी मोठया उत्साहात साजरा केला जातो. मराठी विभाग व वाड्.मय मंडळाच्या वतीने वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने साजरा होणारा मराठी राजभाषा दिन महाविद्यालयात मोठया उत्साहात व बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालय रांगोळी स्पर्धा, काव्यलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

राजभाषा दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या मुख्य कार्यक्रमात वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा संपूर्ण जीवनपट ध्वनीचित्रफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. या प्रसंगी विद्यार्थ्यांना संबोधित करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.डी.गिरी यांनी मातृभाषेचे महत्व सांगितले व जागतिकीकरणात मातृभाषा संवर्धन काळाची गरज असल्याचे सांगितले.

या प्रसंगी मराठी विभाग प्रमुख सहा.प्रा.ईश्वर ढोले यांनी मातृभाषेच्या संवर्धनात विद्यार्थ्यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. हे स्पष्ट करताना अकराव्या शतकापासून आजपर्यंत मराठी भाषेच्या स्थितीगतीचा आढावा घेतला व प्रत्येकाने मातृभाषेबद्दल अभिमान बाळगावा, असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाड्.मय मंडळ सचिव कु.सोनल पालकर हिने केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, सर्व ज्ञानशाखांमधील विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.


दोशी वकील कला व गो.ना.सह.बँक विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
मराठी विभाग
मराठी भाषा व वाङ्मय मंडळ
मराठी राजभाषा दिन
मार्गदर्शक
डॉ. जी. डी. गिरी
प्राचार्य
शनिवार, दि. २७ फेब्रुवारी २०१६



मराठी भाषादिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्राचार्य डॉ.जी.डी.गिरी




**विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सहा.प्रा.ईश्वर ढोले**

## ➢ रांगोळी स्पर्धा :-

शनिवार दिनांक २७/०२/२०१६ रोजी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी विद्यार्थ्यांना **'मराठी वाङ्मय'** ही संकल्पना देण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण २२ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. बक्षीस पात्र विद्यार्थी पुढीलप्रमाणे.या स्पर्धेला परीक्षक म्हणून प्रा.खराडे बी.एस. व प्रा.टाके एम.एच.यांनी काम पाहिले.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | बक्षीसपात्र क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | कु. गायकवाड पंकज मिलिंद | तृतीय वर्ष कला | प्रथम क्रमांक |
| २ | कु. मांडलेकर नाजनीन निजाम | तृतीय वर्ष कला | प्रथम क्रमांक |
| ३ | कु. शिर्के शालिनी शांताराम | तृतीय वर्ष कला | व्दितीय क्रमांक |
| ४ | कु. गोठल श्रद्धा सहदेव | व्दितीय वर्ष कला | तृतीय क्रमांक |
| ५ | कु. आंबेतकर बेनिका रमेश | तृतीय वर्ष कला | उत्तेजनार्थ |
| ६ | कु. जुम्मल शबनुर इब्राहिम | तृतीय वर्ष कला | उत्तेजनार्थ |

## रांगोळी स्पर्धा - विविध क्षणचित्रे










**'मराठी भाषा दिना'** च्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या सर्व कार्यक्रमांना विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी खूप मोठया संख्येने सहभागी झाले होते.

वाड्.मय मंडळ सेक्रेटरी कु. सोनल पालकर हिने वर्षभर होणा-या उपक्रमांसाठी विशेष कष्ट घेतले. या उपक्रमांशिवाय वाड्.मय मंडळाकडून तालुका, जिल्हा, आंतरमहाविद्यालयीन, राज्य स्तरावर होणाऱ्या विविध स्पर्धांसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग असतो. या स्पर्धांसाठी वाड्.मय मंडळाकडून विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले जाते.

हे सर्व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.रमणलाल नारायण शेठ, चेअरमन मा.श्री.दिलीपभाई नथुराम शेठ, प्राचार्य डॉ.जी.डी.गिरी यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, सेक्रेटरी कु.सोनल पालकर तसेच सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनी या सर्वांचे सहकार्य मिळाले, धन्यवाद !

**प्रा. ईश्वर ढोले**
**अध्यक्ष**
**मराठी भाषा व वाड्.मय मंडळ**